RNI No. MAHBIL/2009/37831




# महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ८८(२)] शुक्रवार, जुलै ५, २०१९/आषाढ १४, शके १९४१ [पृष्ठे ३ किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २१५

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जुलै २०१९

आदेश

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्र. सेप्रनि. १८१८/प्र.क्र. ३१३/पोल-५अ.–महाराष्ट्र पोलीस अधिनियम, (१९५१ चा २२) च्या कलम-५ब आणि त्यानुषंगाने प्रदान करण्यात आलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र राज्यातील गृह विभागाच्या अखत्यारीतील पोलीस दलातील " महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ " मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :–

१. या नियमाला " महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (दुसरी सुधारणा) नियम, २०१९ " असे संबोधण्यात यावे.

२. " महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ " मधील नियम ४ चे उपखंड (२) खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे :--

**शारीरिक चाचणी (५० गुण):-**

जे उमेदवार लेखी चाचणीत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत ३३%) गुण मिळवून लेखी परीक्षा उत्तीर्ण होतील, त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १:१० या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना खालीलप्रमाणे शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**शारीरिक चाचणी पुढीलप्रमाणे एकूण ५० गुणांची असेल:–**

**(अ) पुरूष उमेदवार :**

| | |
|---|---|
| (अ) १६०० मीटर धावणे | ३० गुण |
| (ब) १०० मीटर धावणे | १० गुण |
| (क) गोळा फेक | १० गुण |
| एकूण . . | ५० गुण |

**(ब) महिला उमेदवारः**

| | |
|---|---|
| (अ) ८०० मीटर धावणे | ३० गुण |
| (ब) १०० मीटर धावणे | १० गुण |
| (क) गोळा फेक | १० गुण |
| **एकूण . .** | **५० गुण** |

**स्पष्टीकरण.**—जे उमेदवार लेखी चाचणीत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवाराबाबत ३३%) गुण मिळवून लेखी परीक्षा उत्तीर्ण होतील. त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १:१०च्या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल. उदाहरणार्थ, जर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १० जागा व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ५ जागा असतील तर अनुसूचित जाती प्रवर्गातील १०० (१० × १०=१००) व अनुसूचित जमाती प्रवर्गातील ५० (५ × १०=५०) उमेदवार शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरतील. तथापि, अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणानुक्रमे १०० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गांतर्गत शारीरिक चाचणीसाठी पात्र असतील. तसेच, अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणानुक्रमे ५० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गांतर्गत शारीरिक चाचणीसाठी पात्र असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्यं. मा. भट,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 4th July 2019

### Order

MAHARASHTRA POLICE ACT.

No. RCT. 1818/CR-313/Pol-5A.— In exercise of the power conferred by caluse (*b*) of section 5 of the Maharashtra police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Police Constables (Recruitment) (Second Amendment) Rules, 2019.

2. In rule 4 of the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, for sub-rule (*2*), the following sub-rule shall be substituted, namely :—

The candidates securing a minimum of 35% marks (33% marks in respect of Backward Class Category candidates) in the Written Test shall be eligible to be called to appear for a Physical Test in the ratio of 1:10 of vacancies advertised in the respective catagories. The physical test will be of a total 50 marks as follows, namely :—

**Physical Test (50 marks).—**

**(A) Male Candidates :**

| | |
|---|---|
| (A) 1600 Meters Running | 30 Marks |
| (B) 100 Meters Running | 10 Marks |
| (C) Shot Put | 10 Marks |
| **Total Marks ..** | **50 Marks** |

**(B) Female Candidates :**

| | |
|---|---|
| (A) 800 Meters Running | 30 Marks |
| (B) 100 Meters Running | 10 Marks |
| (C) Shot Put | 10 Marks |
| **Total Marks ..** | **50 Marks** |

*Explanation* :—Candidates securing a minimum of 35 % marks (33% marks in respect of Backward Class category candidates) in the Written Test shall be eligibal to be called to appear for a Physical Test in the ration of 1:10 of the vacancies advertised in the respective catagories. If, for example, there are 10 vacancies in the Scheduled Caste Category and 5 vacancies in the Scheduled Tribes Category, than 100 (10X10=100) candidates will be listed on merit in the Schedules Caste Category and 50 (5X10=50) candidates, will be listed in the Scheduled Tribes Category. However, all candidates in the Scheduled Caste Category who have secured the same marks as the Scheduled Caste candidate at the 100 rank shall be eligable to be called to appear for a Physical Test. Similarly, all Scheduled Tribes Category candidates who have secured the same marks as the Scheduled Tribes candidate ranking 50th rank will be eligible to be called to appear for a Physical Test.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. M. BHAT,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.